लोकपत्र दि. 10/01/2024

# स्थानिक गुन्हे शाखेकडून गांजा जप्त; तिघांना अटक

**नांदेड/प्रतिनिधी**

नांदेड शहरात व जिल्हयात चोरी छुप्या मार्गाने होत असलेल्या आंमली पदार्थ गांजाचे आवक व विक्रीची गोपनिय माहिती हस्तगत करुन त्याचे विरुध्द कायदेशिर कार्यवाही करणे बाबत पोलीस अधीक्षक, नांदेड यांनी पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा, नांदेड यांना आदेशित केले होते. त्यावरुन स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय यांनी वेगवेगळे पथके नेमुन त्यांना नांदेड शहरातील व जिल्हयातील आंमली पदार्थ गांजाचे आवक व विक्रीची गोपनिय माहिती काढुन कार्यवाही करणे बाबत आदेशित केले होते.

दि. ८ जानेवारी रोजी पोलीस उपनिरीक्षक दत्तात्रय काळे यांना गोपनिय माहिती मिळाली की, नांदेड शहरात आंमली पदार्थ गांजाची विक्री करण्यासाठी गांजा घेवुन काही इसम नांदेड शहरात



येणार आहेत. या मिळालेल्या माहिती प्रमाणे त्यांनी वरिष्ठांना माहिती देवुन, राजपत्रित अधिकारी यांना बोलावुन घेवुन, अधिकारी, पंच व स्टाफसह पोलीस ठाणे शिवाजीनगर हद्दीत छापा मारुन, आरोपी नामे शेख अनिस शेख सलीम रा. नई आबादी, शिवाजीनगर, नांदेड, शेख इम्रान शेख अहेमद रा. तेहरानगर, नांदेड, भुजंग निवृत्ती जोंधळे रा. आंबेडकरनगर, नांदेड या आरोपीतांना ताब्यात घेवुन त्यांचेकडुन एकुण रु. १,०८,०००/ रूपयांचा आंमली पदार्थ गांज्या जप्त केला आहे. यातील आरोपीतांना सदरचा गांज्या हा आरोपी हामीद खान गौस खान रा. नई आबादी, शिवाजीनगर, नांदेड याने विक्री करण्यासाठी दिल्याचे सांगीतले आहे तो गुन्हयात फरार आहे. सदर प्रकरणी पोलीस ठाणे शिवाजीनगर, नांदेड येथे एन. डी. पी. एस. अॅक्ट प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कामगीरी पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अपर पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, अपर पोलीस अधीक्षक खंडेराव धरणे यांच्या मार्गदर्शनाखाली एलसीबीचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय, नायब तहसिलदार के. बी. डांगे, पोलीस उपनिरीक्षक दत्तात्रय काळे, आनंद बिचेवार, पोलीस अंमलदार बालाजी तेलंग, किशन मुळे, गजानन बयनवाड, विलास कदम, रणधीर राजबंशी, धम्मानंद जाधव, राजु पुलेवार, महिला पोलीस अंमलदार किरण बाबर व चालक श्रीरामे, कलीम शेख यांनी पार पाडली आहे.

लोकमत दि. 10/01/2024

# शहरात पकडला १ लाखाचा गांजा

**लोकमत न्यूज नेटवर्क**

**नांदेड :** स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेच्या पथकाने ८ जानेवारी रोजी शहरात छापा टाकून १ लाख रुपयांचा गांजा पकडला असून, तीन आरोपींना अटक केली आहे. या गुन्ह्यातील तिसरा आरोपी फरार आहे.

नांदेड शहरात छुप्या मार्गाने अंमली पदार्थांची विक्री होत आहे. शहरात आवक होत असलेल्या या अंमली पदार्थांना अटकाव घालण्यासाठी पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेला आदेश दिले होते. त्यावरून स्थानिक गुन्हे शाखेने पथकांची स्थापना केली. हे पथक माहिती घेत असतानाच शिवाजीनगर पोलिस ठाण्याच्या हद्दीत आरोपींकडे गांजा असल्याची माहिती मिळाली. या माहितीच्या आधारे पोलिस उपनिरीक्षक दत्तात्रय काळे यांनी राजपत्रित अधिकारी आणि पंचांना सोबत घेऊन शिवाजीनगर पोलिस ठाण्याच्या हद्दीत छापा टाकला. त्यावेळी शेख अनिस शेख सलीम (रा.नई आबादी) आणि शेख इम्रान शेख अहमद (रा.तेहरानगर), भुजंग निवृत्ती जोंधळे (रा.आंबेडकरनगर) या तीन आरोपींना ताब्यात घेतले. आरोपींकडून १ लाख ८ हजार रुपयांचे अंमली पदार्थ (गांजा) जप्त केला. आरोपी हमीद खान गौस खान (रा.नई आबादी) याने विक्रीसाठी गांजा दिल्याची माहिती आरोपींनी दिली. आरोपी हमीद खान हा फरार आहे.

पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अपर पोलिस अधीक्षक अबिनाशकुमार, खंडेराव धरणे यांच्या मार्गदर्शनाखाली निरीक्षक उदय खंडेराय, नायब तहसीलदार के. बी. डांगे, उपनिरीक्षक दत्तात्रय काळे, आनंद बिचेवार, बालाजी तेलंग, किशन मुळे, गजानन बयनवाड, विलास दम, रणधीर राजबंशी, धम्मानंद जाधव, राजू पुलेवार, किरण बाबर, श्रीरामे, कलीम शेख यांनी ही कामगिरी केली.